थोडक्यात...

पत्नीचा खून करून पतीची आत्महत्या

चाळीसगाव । तालुक्यातील हातगाव येथे चारित्र्याच्या संशयावरुन पत्नीचा खून करून पतीनेही भितीपोटी गळफास घेऊन आत्महत्या केली.मृतांचे नाव वर्षा विजय चव्हाणके (३८) व विजय सुकदेव चव्हाणके (४५) असे आहे. याप्रकरणी चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला गुन्हां दाखल करण्यात आला आहे.

बोराडीत पित्याचा खून; मुलगा अटकेत

धुळे । वडिलांनी स्वतःच्या घरात राहू नये, यावरून मुलाने वडिलांचा खून केल्याची धक्कादायक घटना बोराडी (शिरपूर) येथे घडली. सिंगा तुमड्डु पावरा (वय ७०) असे मृताचे नाव असून, त्यांच्या मुलानेच लाकडी दांड्याने हल्ला करून गंभीर जखमी केले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी आरोपी सुनिल सिंगा पावरा (वय ३०) याला ताब्यात घेतले आहे. सिंगा तुमड्डु पावरा व मुलगा सुनिल या दोघांनी एकत्र घर बांधले होते. या घरात वडीलांनी राहू नये, यावरून सुनिलचे गेल्या दोन दिवसांपासून वडिलांशी भांडण सुरू होते.

रोकड प्रकरणी मोगले ताब्यात

धुळे । शहरातील गुलमोहर शासकीय विश्रामगृहात आढळून आलेल्या १ कोटी ८४ लाखांच्या रोकड प्रकरणाच्या तपासाला गती आली आहे. आज पोलिसांनी शिवसेना नेते तथा माजी आमदार अनिल गोटे यांचा जबाब नोंदवून घेतला. दरम्यान, या प्रकरणातील दुसरा संशयित आरोपी राजकुमार मोगले हा गेले अकरा दिवस फरार होता. पोलिसांनी त्याचा शोध घेत आज त्याला धुळे येथे तपासासाठी आणले आहे. दरम्यान, आयकर विभागाकडूनही या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

नितेश राणेंना सिंधुदुर्गात जामीन घेण्याची मुभा

मुंबई । शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांच्याबाबत बदनामीकारक विधान करणाऱ्या भाजप आमदार नितेश नारायण राणे यांना माझगाव दंडाधिकारी न्यायालयाने मोठा दिलासा दिला. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी आरती कुलकर्णी यांनी राणे यांच्या विरोधात जारी केलेले जामीनपात्र वॉरंट रद्द करत उपस्थित न राहण्याबाबत सशर्त परवानगी दिली. तसेच राणे हे सध्या कोकणात असल्याने सिंधुदुर्ग पोलीस ठाण्यात २ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन देण्याचे आदेश दंडाधिकारी न्यायालयाने जारी केले.

विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी नियोजन करा: डॉ. बच्छाव

नाशिक । प्रतिनिधी : येत्या सोळा तारखेला शाळा सुरू होत आहेत. त्या अनुषंगाने शाळेमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती व शाळेची गुणवत्ता वाढवण्याकरता पहिल्या व दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या हस्ते सत्कार करण्याकरता नियोजन करण्याचे परिपत्रक प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. नितीन बच्छाव काढले आहे. २०२५-२६ या शालेय वर्षात मुलांची उपस्थिती चांगली असावी, त्यात शाळेची गुणवत्ता देखील वृद्धिंगत व्हावी तसेच शैक्षणिक वर्ष सुरू होताना शाळा भेटी, विद्यार्थ्यांचे स्वागत, दत्तक शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या पटसंख्येमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने पहिल्या व दुसऱ्या दिवशी खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, तसेच सर्व सनदी अधिकारी यांच्या मतदारसंघातील किंवा नजीकच्या किमान एका शाळेत भेट देऊन सर्व नवगत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याकरता नियोजन करावे तसेच लोकप्रतिनिधी व अधिकारी यांना एकेक संपर्क अधिकारी तसेच ते कोणत्या शाळेला भेटी देणार आहेत, याबाबत नियोजन करावे, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

महापालिकेतील रिक्त पदे त्वरित भरा

सुधाकर बडगुजर यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

नाशिक । प्रतिनिधी

सिंहस्थासारख्या मोठ्या आयोजनाच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या पदभरतीची मागणी नाशिक म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष सुधाकर बडगुजर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ३६०९ रिक्त पदे तातडीने भरावीत, तसेच वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना तत्काळ पदोन्नती द्यावी, अशी मागणी शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

कामाचा व्याप, सेवकवर्ग तुटपुंजा

नाशिक महापालिकेचे क्षेत्रफळ, वाढलेली लोकसंख्या (२३ लाखांपर्यंत), औद्योगिक व तीर्थक्षेत्राचे महत्व लक्षात घेता मनपाच्या कामाचा व्याप खूप मोठा आहे. परंतु तुलनेत सेवकवर्ग अत्यंत अपुरा असून, सध्या केवळ ४१०० कर्मचारी कार्यरत, तर ३६०९ पदे रिक्त आहेत.

विभागनिहाय मंजूर पदे

दि. १६ एप्रिल २०२१ च्या शासन निर्णयानुसार नाशिक मनपाला विविध विभागांसाठी ६३५ नवीन पदे मंजूर करण्यात आली होती. त्यात वैद्यकीय विभाग (१७९ पदे),अग्निशमन (३४३ पदे), अभियांत्रिकी (४३ पदे), लेखा(१२ पदे), घनकचरा व्यवस्थापन (५८ पदे) या पदांसह एकूण आकृतीबंधातील मंजूर पदांची संख्या ७७२९ असून, त्यातील ३६०९ पदे रिक्त आहेत. कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये २००० सफाई कर्मचारी व २१०० इतर संवर्गातील कर्मचारी आहेत.

वर्ग-३, वर्ग-४ सेवक पदोन्नतीपासून वंचित

वर्ग-१ व वर्ग-२ मधील अधिकाऱ्यांना वेळोवेळी पदोन्नती देण्यात आली असली, तरी वर्ग-३ व ४ च्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आलेली नाही. उलटपक्षी, त्यांच्यावर वरच्या दर्जाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. हा अन्याय दूर करण्यासाठी या कर्मचाऱ्यांना तात्काळ पदोन्नती देण्याचे आदेश देण्यात यावेत, असेही शिष्टमंडळाने नमूद केले. याबाबत आपण सकारात्मक विचार करुन तातडीने निर्णय घेणार असून, याबाबत कारवाई करण्यात येणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. शेवटी त्यांनी सुधाकर बडगुजर यांना आपण पुन्हा भेटू असे सूचक विधान केले.

काही काळ पावसाचे मोठे खंड : डॉ.साबळे

पुणे । प्रतिनिधी

यंदा महाराष्ट्रात सरासरी १०६ टक्के पाऊस होण्याची शक्यता आहे. हा अंदाज कमाल तापमान, सकाळ व दुपारची सापेक्ष आर्द्रता, वाऱ्याचा ताशी वेग आणि सूर्यप्रकाशाचा कालावधी या निकषावर आधारित आहे. जुलै महिन्यात पावसाचे प्रमाण अधिक राहील. कमी दिवसात अधिक पाऊस आणि काही काळ पावसाचा मोठे खंड असे हवामान राहणार असल्याचा अंदाज ज्येष्ठ कृषी हवामान तज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. यामध्ये पाच टक्के कमी अधिक तफावत आढळून येईल, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. साबळे म्हणाले, महाराष्ट्रासाठी २०२५ सालासाठी जून ते सप्टेंबर मान्सूनचा अंदाज वर्तवला आहे.वाऱ्याचा वेग, सूर्यप्रकाशाचा कालावधी कमी आढळल्याने जून, जुलै महिन्यात धुळे, राहुरी, परभणी, निफाड, अकोला पाडेगाव आणि कोल्हापूर येथे पावसात मोठे खंड राहण्याची शक्यता असून, दापोली, पुणे, नागपूर, सोलापूर, जळगाव, व कराड येथे खंडाचा कालावधी कमी राहणार आहे.

पश्चिम विदर्भातील अकोला भागात १०५ टक्के पाऊस असणार आहे. मध्य विदर्भातील नागपूर आणि यवतमाळमध्ये १०० टक्के, पूर्व विदर्भातील शिंदेवाही (चंद्रपूर) येथे १०० टक्के, मराठवाडा विभागातील परभणी येथे ११० टक्के, कोकण विभागाती दापोली येथे १०६ टक्के, उत्तर महाराष्ट्रातील निफाड येथे ११३ टक्के, धुळे येथे १०० टक्के, जळगाव येथे १०० टक्के तर पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर येथे १०१ टक्के, कराड येथे १०८ टक्के, पाडेगाव ११५ टक्के, सोलापूर येथे १०३ टक्के, राहुरी येथे ११० टक्के तर पुणे येथे ११५ टक्के पाऊस असणार आहे, असेही डॉ. साबळे यांनी सांगितले.

कुशावर्तातील गर्दीचा प्रश्न अखेर निकाली

त्र्यंबकेश्वरच्या दहा आखाड्यांनी घेतली सकारात्मक भूमिका

नाशिक । प्रतिनिधी

प्रयागराज कुंभमेळ्याच्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर नाशकामध्ये आगामी सिंहस्थ कुंभ मिळण्यासाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनापुढे त्र्यंबकेश्वरमधील कुशावर्ततील स्नानाचा प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र संत-महंतांच्या आखाडा प्रमुखांनी सकारात्मक भूमिका घेतल्यामुळे प्रशासनाने सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

सिंहस्थाच्या मागील वर्षाच्या आकडेवारीमध्ये यंदा दहापट वाढ होण्याची शक्यता आहे. त्र्यंबकेश्वरमध्ये स्नानासाठी कुशावर्त हे एकमेव स्थान आहे. त्या ठिकाणी संत, महंत आखाड्यातील साधू-संतांची मोठी गर्दी राहते. या पार्श्वभूमीवर कुशावर्तावर येण्या व जाण्याचा मार्ग एकच असल्यामुळे कुशावर्तावर गर्दी दाटण्यातून दुर्घटनेची भीती प्रशासनाने व्यक्त केली होती.

याबाबत त्र्यंबकेश्वरमध्ये स्नानासाठी येणाऱ्या दहा ही आखाडा प्रमुखांशी संवाद साधला जात होता. मुख्यमंत्र्यांच्या बैठकीतही त्यावर चिंता व्यक्त करण्यात आली होती. मागील काही महिन्यांपासून आखाडा प्रमुखांशी याबाबत मन वळवणे सुरू होता.

अखेर मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीमध्ये सर्व आखाडा प्रमुखांनी एकमताने निवडक संत म्हणतात कुशावरतात स्नान केले जाईल व इतर सर्व साधूसंत व आखाड्यातील खालचे हे घाटावर स्नान करून खूप कुंभ स्नान करतील याबाबत आखाडा प्रमुख हरिगिरी महाराज यांनी सर्व प्रतिनिधींना हात उंचावून

भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले या बैठकीत दहा आखाड्यांपैकी सात आखाड्यांनी हा हात उंच करून पाठिंबा व्यक्त केला. उर्वरित तीन आखाड्यांचे निर्णयक्षम संत आखाडा प्रमुख उपलब्ध नसल्यामुळे त्यांचा निर्णय चर्चेतून सोडवला जाईल, असे महंत हरीगिरी महाराजांनी बैठकीत सांगितले.

त्यामुळे संत महंत घाटावर स्नान करणार असल्यामुळे भाविकांचाही घाटावरील स्नानाचा प्रश्न सुटणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यामध्ये त्र्यंबकेश्वरला घाटांवर स्नान करून सिंहस्थ स्नान घेण्याचा प्रघात या सिंहस्थापासून सुरू होण्याची शक्यता आहे.

गुरु सिंहस्थ राशीत प्रवेशाच्या तारखेवरुन चर्चा

गुरु सिंहस्थ राशीत प्रवेश हा पौर्णिमेला होत आहे. त्र्यंबकेश्वरच्या संतांच्या नुसार स्नान पर्वणीची तारीख चुकली असून पौर्णिमेचीच तारीख असणे अपेक्षित असल्याचे मत व्यक्त केले. मात्र पूरोहितांनी याबाबत खुलासा करुन गुरुचा सिंह राशीत आमावस्येचाच प्रवेश पर्वणीसाठी मानला जात असल्याने पहिली पर्वणी तेथूनच सुरु करण्याचा खुलासा केल्यानंतर त्यांचे समाधान झाले व विषयावर पडदा पडल्याचे समजते.

मानवसेवा वृद्धाश्रमात बेडशीट वाटप

नाशिक । प्रतिनिधी

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे केंद्रीय सल्लागार, आयटकचे जिल्हाध्यक्ष, संघटनेचे मार्गदर्शक व्ही. डी. धनवटे यांच्या वाढदिवसानिमित्त मानवसेवा वृद्धाश्रमातील वयोवृद्धांना शेकडो बेडशीट वाटप करण्यात आले.

याप्रसंगी वर्कर्स फेडरेशनचे उपसरचिटणीस अरुण म्हस्के यांच्या हस्ते मानवसेवा वृद्धाश्रमाच्या संचालिका ललिता नवसागर यांच्याकडे हे बेडशीट सुपूर्द करण्यात आले. कार्यक्रमास पंडितराव कुमावत, सतीश पाटील, दीपक गांगुर्डे, एस. आय. खान, सुनील मालुंजकर, महेश वाळुंज, महेश कदम, अतुल आगळे, महेश पाचपांडे, सचिन पवार, प्रदीप मोरे, गितेश्वर वाघेरे, सुरेश उगले, रवींद्र गुंजाळ, योगेश शिंदे, हिरामण शिंदे, अमोल काळे, विष्णु रकिबे, कांतीलाल राठोड आदी उपस्थित होते. प्रियदर्शी सम्राट अशोका वेल्फेअर फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष टी. एल. नवसागर यांनी स्वागत केले.

म्हाडाच्या सदनिकाधारकांनी वाचला विविध तक्रारींचा पाढा

नाशिक । प्रवेशद्वारजवळ भिंत बांधली. ती काढा, लिप्ट बंद आहे ती दुरुस्त करुन द्या, पाणीपुरवठा केला. जलवाहिनी टाकली, मात्र पाणी येत नाही. ते पाणी मिळवून द्या, अशा विविध तक्रारींचा पाढा आज म्हाडाच्या सदनिकाधारकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी शिवकुमार आवळकंठे यांच्यासमोर वाचला.

नाशिक गृहनिमाण क्षेत्र विकास मंडळा(म्हाडा)ने आज सदनिकाधारकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी खास जनता दरबारचे आयोजन केले होते. त्यावेळी पाच योजनांच्या सदस्यांनी येथे येऊन तक्रारींचा पाढा वाचला. म्हाडाने सदनिकाधारकांना सदनिका दिल्या, मात्र तेथे रहायला गेल्यानंतर जी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करायची होती. त्याद्वारे देखभाल करायची होती. ती मात्र फारसा कोणी करत नाही. बऱ्याच ठिकाणी सोसायटी स्थापन झालेली नाही. त्यामुळे पाणी, वीजबिल थकले, गच्चीवर पाणी साचले. गळती सुरु झाली किंवा देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाले की समस्या उभ्या राहतात. त्या समस्या सोडवण्यासाठी म्हाडाचे दरवाजे ठोठावतात. मात्र म्हाडा त्यावेळी झालेला करार, ताबा देतांना असलेली परिस्थिती याची जाणीव करुन देते. तेव्हा मात्र वादाचे प्रसंग उद्भवत आहे. आज जुन्याच तक्रारी पुन्हा सद्स्यांनी केल्या, त्या सर्व आवळकंठे यांना जाणून घेतल्या.

शब्दकोडे : २६५



आडवे शब्द : १) हरवलेले, सापडत नसलेला. ४) साटेलोटे. ८) सोन्याचा धागा, कलाबतू. ९) दुर्बळ, असमर्थ. १०) आनंदाने नाजणे, उड्या मारणे इ. ११) बेचव, पचपचीत. १२) मनाची फिरणारी इच्छा. १३) तंबाखूचे चूर्ण. १५) मौल्यवान रत्ने. १६) दही घुसळण्याचे साधन. १७) पाय. १८) कुलुपाची चावी. १९) उपस्थित. २०) मज्जाव. बंदी. २२) लक्ष्मीचे एक नाव. २३) झांबणारे, खरबरीत. २६) श्रीरामाचे एक नाव. २८) सूर्याचे मकरराशीस जाणे. ३१) कपोल. ३३) कलाकार ३४) सारख्या अंतरावरचा. ३४) सारख्या अंतरावरील, पॅरलल (मराठी) ३६) नेहमी, सर्व ठिकाणी. ३७) शरमणे. ३८) शिळ्याच्या विरुद्ध. ३९) गाडीचे छत. ४१) बाण मारणे. ४३) शिंपला, समुद्रातील एक छोटा प्राणी. ४४) पर्जन्यकाळ. ४६) एकाग्र नजर. ४८) सीतेचे वडील. ४९) श्रीमंत. ५२) फलातील पेय. ५४) मनाला टोचणारे दुःख. ५५) गांवठी दंतमंजन. ५७) नजरेचा तीर. ६०) विनाकारण. ६३) कार्य. ६४) उणीव भरून काढणे. ६५) बांबू. ६६) एक श्वास-रोग.

उभे शब्द : १) हर्ताचा राजा. २) माळ, सर. ३) एक पालेभाजी. ४) पराक्रमी जवानाला सरकारतर्फे दिली जाणारी बहुमानाची पदवी. ५) पोशाख, चेहरापट्टी बदलणे. ६) समुद्राचा जमीनीकडचा भाग. ७) गणपती. ९) उपयोग. १०) शिल्लक राहिलेली रक्कम. ११) अगदी सुरक्षित. १४) परंतु, अट. १६) मातीचा कण. १७) न्यूनता, दुर्मिळता, अभाव. १९) सहस्र. २१) वात्रट. २२) शिखराचे टोक. २४) सुंदर तरुणी. २५) मागणीचा लकडा. २७) निबिड, दाट. २९) लाकूड चिरण्याचे, कापण्याचे हत्यार. ३०) आग्रा येथील ताजमहालचा दगड. ३२) हावरटपणा. ३५) वाघाची मावशी. ३६) आरास, शोभिवंत करणे. ३८) संगीतातील ठेका. ४०) बिल्ला. ४१) संभवनीय. ४२) साडेतीन मुहूर्तातील एक मुहूर्त. ४३) अशुभ मानला जाणारा एक रंग. ४५) श्वशुर. ४७) यमासारखा क्रूर. ४८) जन्म. ५०) लेख लिहिणारा. ५१) तापापूर्वीचे शहारे. ५३) लुगडे, पातळ. ५६) वाढ थांबणे. ५८) एक शब्दलंकार. ५९) सुरंगाची दारू. ६०) खून. ६१)श्वसनेंद्रिय. ६२) नरमांजर

शब्दकोड२६४चे उत्तर



निवडणूक रंग

एटीएसची छापेमारी

साकिब नाचण सह इतर अनेक घरात सर्च ऑपरेशन राबविले. मुंबई एटीएस पथकासह ठाणे, नाशिक येथील पथकाने या कारवाईमध्ये सहभाग घेतला होता. पहाटे ३ वाजता सुरू झालेली कारवाई दुपारी १ वाजता पूर्ण झाली. या कारवाईमध्ये बोरिवली गावातील साकिब नाचणसह एकूण २२ घरांमध्ये सर्च ऑपरेशन करून तेथील संशयित व्यक्तींचे मोबाईल व लॅपटॉप तपासण्यात आले आहेत. या कारवाईवेळी अनेक मोबाईल व सिमकार्ड हे ताब्यात घेण्यात आले आहेत. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अजून एटीएस पथकाने कोणालाही अटक केलेली नाही.

बळीराजाला मदतीचा हात आखडता

पडलेल्या अवकाळी पाऊस, गारपिटीमुळे राज्यातील बाधित शेतकऱ्यांना खूष करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषाबाहेर जाऊन वाढीव दराने अनुदान स्वरुपात मदत देण्याचा निर्णय घेतला होता. त्यासंदर्भात १ जानेवारी २०२४ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयात जमिनीची मर्यादा दोन हेक्टरवरून तीन हेक्टर केली होती. त्यामध्ये जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी प्रतिहेक्टर १३ हजार ६०० रुपये, बागायत पिकांच्या नुकसानीसाठी प्रतिहेक्टर २७ हजार रुपये आणि बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी प्रतिहेक्टर ३६ हजार रुपये देण्याचे म्हटले आहे. मात्र, यावर्षी एप्रिल, मे महिन्यात झालेल्या अवकाळी आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मुख्यमंत्र्यांनी बाधित क्षेत्राचे पंचनामे तातडीने करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, २७ मे रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत १ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयाद्वारे घोषित केलेले दर रद्द करून त्याऐवजी आता पुन्हा २३ जानेवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार दोन हेक्टरच्या मर्यादेत शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यावरील कर्जाचा डोंगर आणि लाडक्या बहिणींना दिल्या जाणाऱ्या अनुदानामुळे सरकारने अनेक गोष्टींवर मर्यादा आणल्या आहेत. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईपोटी दिल्या जाणाऱ्या जमिनीची मर्यादा कमी करण्याचा सरकारने निर्णय घेतल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

सैनिकांचे मृतदेह देणार

दिले जातील. हे मृतदेह देताना त्या भागात सीजफायर गरजेचा आहे. या बैठकीत २-३ दिवसांपुरता मर्यादित सीजफायर प्रस्ताव करण्यात आला जो काही निवडक परिसरात लागू होईल. त्याशिवाय रशिया-युक्रेन युद्धात १ हजार युद्धकैदी अदलाबदली करण्यावर सहमती झाली. लवकरच ही प्रक्रिया सुरू होईल. युद्धकैद्यांची देवाणघेवाण करण्यासाठी स्थायी समिती बनवली जाईल. जेणेकरून भविष्यात युद्धकैद्यांची प्रक्रिया वेगाने पूर्ण करता येईल. रशियाकडून तीन प्रमुख भागांचा समावेश असलेला औपचारिक शांतता करार युक्रेनला सुपूर्द करण्यात आला आहे. हा करार दीर्घकालीन शांततेच्या दिशेने एक ठोस पाऊल असू शकते. युक्रेनने हा करार विचाराधीन ठेवला आहे. तर रशियासोबत कुठलाही तोडगा केवळ वरिष्ठ पातळीवर केला जाऊ शकतो. जूनच्या अखेरपर्यंत राष्ट्रपती व्लोडिमिर झेलेन्स्की आणि व्लादीमीर पुतिन यांच्यात थेट बैठक आयोजित केली जाईल असे युक्रेनचे संरक्षण मंत्री रुस्तेम उमेरोव यांनी म्हटले.

मॅरेज डिप्लोमसीतून मायाजाल

एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारावर चालणारा विलास शिंदे हा कार्यकर्ता असल्याने मी त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी खास आल्याचे आवर्जून सांगितले. विलास शिंदे यांनीही हा आपल्या कुटुंबासाठी सर्वोच्च आनंदाचा क्षण असल्याचे सांगून, माझ्या जन्माचे सार्थक झाल्याच्या भावना व्यक्त केल्या.याच विवाहासाठी नाशिकमध्ये असलेले ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना विचारणा केली असता विवाह सोहळ्याला कोणीही जाऊ शकते. विवाहसोहळा हा आनंदाचा क्षण आहे. त्याला राजकीय रंग देऊ नये असे सांगत सारवासारवचा प्रयत्न केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने मध्यंतरी भाकरी फिरवण्याच्या निमित्ताने जिल्हाभरात खांदेपालट केली होती. जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांना उपनेतेपदी बढती देत जिल्हाप्रमुख पदावर डी. जी. सूर्यवंशी यांची नेमणूक केली. प्रत्यक्षात विलास शिंदे यांची वर्णी लागण्याची अपेक्षा शिवसैनिकांमध्ये होती. मात्र विलास शिंदे यांना महानगरप्रमुख पदावरच ठेवत डीजी सूर्यवंशी यांना बढती दिल्याने शिंदे काहीसे नाराज होते. मध्यंतरी कार्यक्रमांना गैरहजर राहण्याचे प्रमाण वाढले होते. त्यांच्या मुलीच्या विवाह सोहळ्यास उपस्थित राहून संजय राऊत शुभेच्छा देऊन गेले. एकनाथ शिंदे यांनी मात्र खास हजेरी लावून विलास शिंदे यांना आपल्या गोटात ओढले, अशी चर्चा विवाह सोहळ्यात रंगली होती.